२२३४

दै० सकाळ

५ डिसेंबर २००७

# कमला महाविद्यालयात महात्मा फुले पुण्यतिथी

कोल्हापूर, ता. ३ : येथील ताराराणी विद्यापीठ संचलित कमला महाविद्यालयात महात्मा जोतिबा फुले यांची पुण्यतिथी झाली.

ताराराणी विद्यापीठाचे सचिव व कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी महात्मा फुलेंच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. तसेच उषाराजे हायस्कूलच्या शिक्षिका श्रीमती जयश्री दानवे यांना जयवंत कुलकर्णी स्मृती पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ. पाटील यांनी संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.